REGISTERED No. B. 3434




# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ | पुणें, बुधवार तारीख १२ फेब्रुवारी १९४७ | अंक ७

★ वृद्धापकाळची तरतूद
कुटुंबाचें संरक्षण
★ मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न

हे सर्व प्रश्न आयुष्याचा विमा उतरल्यानेंच सुटूं शकतात. तरी आपला विमा
पुणें येथील सुप्रसिद्ध

कॉमनवेल्थ
ॲशुअरन्स कंपनी लि.
मध्येंच उतरा.


—सर्वत्र एजंट्स नेमणें आहेत.—

खालील पत्त्यावर लिहा अगर भेटा

अध्यक्षः—ल. ब. ऊर्फ अण्णासाहेब भोपटकर

श्री. म. जोशी,
मॅनेजिंग डायरेक्टर

अ



अधिक धान्य पिकविण्याची योजना
—यशस्वी होण्यास—
किर्लोस्कर पंपिंग सेट्स
हें अमोघ साधन आहे.
त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

आरको

प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तू
आरको निलगिरी तेल
लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४

तयार कपड्यांचे व्यापारी
महिंद्रकर ब्रदर्स
गिरगांव, मुंबई नं. ४
व बुधवार चौक, पुणें

—सर्व प्रांतांतील—
सुती – गरम – रेशमी
—खादीचा उत्तम संच—

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

# विविध माहिती

**दि बँक्स एम्प्लॉईज असोसिएशन**—जळगांवांतील निरनिराळ्या बँकेंतील नोकरांची सार्वजनिक हायस्कूलमध्यें सभा होऊन "दि बँक्स एम्प्लॉईज असोसिएशन" स्थापन करण्यांत आली. सभेंत घटना व नियम तयार करण्यासाठीहि एक समिति नेमली गेली.

**मालगुजरांचा हिस्सा कमी होणार**—मालगुजरांना हल्लीं ५०% हिस्सा मिळतो तो २५% करण्याचा मध्यप्रांत सरकारचा विचार आहे. मालगुजारी रद्द करण्याच्या कार्यक्रमाचें हें पहिलें पाऊल आहे.

**पूना इ. सप्लाय कंपनीची मॅनेजिंग एजन्सी**—दि युनायटेड ईस्टर्न एजन्सीज लि. कडे भडोच इलेक्ट्रिक स. अँड डे. कॉ. लि., नाशिक–देवळाली इ. स. कं. लि. आणि पूना इलेक्ट्रिक स. कं. लि. ह्यांची मॅनेजिंग एजन्सी आहे. ह्या तीन्ही कंपन्यांची मॅनेजिंग एजन्सी रजपुताना टेक्स्टाइल्स (एजन्सीज) लि. ह्या खासगी लिमिटेड कंपनीकडे वर्ग करण्यांत यावयाची आहे. त्यासाठी तीन्ही कंपन्यांच्या विशेष साधारण सभा ता. ३ मार्च रोजीं बोलविण्यांत आल्या आहेत. पूना इ. सप्लाय कं. लि. ची मॅनेजिंग एजन्सी विकत घेण्याकरितां दि पॉवर अँड एनर्जी कं. लि., पुणें ही स्थापन झाली होती हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. त्या कंपनीकडे ही मॅनेजिंग एजन्सी आतां येत नाहीं हें दिसून येईल.

**जर्मन शास्त्रज्ञांवर विश्वास नाहीं**—अमेरिकेंत ॲटम बॉंबसंबंधी संशोधन करीत असलेल्या १० सुप्रसिद्ध जर्मन शास्त्रज्ञांस हें संशोधन करण्यास अमेरिकन सरकारनें बंदी केली आहे. त्यांच्या मदतीनें होणाऱ्या फायद्यापेक्षां ते परत युरोपांत जाऊन गुपित फोडण्याच्या हानीचा संभव अधिक आहे, असें अमेरिकन सरकारास वाटतें. जर्मनी व ऑस्ट्रिया ह्यांतून अमेरिका १,००० शास्त्रज्ञांची आयात करणार आहे. परंतु त्यांचेकडे ॲटम बॉंब सोडून बाकीच्या विषयांचें संशोधन सोपविलें जाईल.

**बिऱ्हाडांचीं भाडीं वाढणार**—भाडेकरूंचें भाडें वाढविण्यास परवानगी देणारें एक बिल मुंबई सरकार तयार करीत आहे. पागडीच्या पद्धतीवर जालीम उपाय त्या बिलांत योजिला जाणार आहे.

**साखर असून उपयोग काय**—जावामध्यें ८ ते १०½ लक्ष टन साखर पडून राहिली आहे. इंडोनेशियाच्या रिपब्लिकचे प्रदेशांत ती असल्याकारणानें डच सरकारला ती हलवितां येत नाहीं. रिपब्लिक सरकारलाहि ती निर्गत करतां येत नाहीं, कारण डच नाविक बंदोबस्त निर्गतीस प्रतिबंध करीत आहे.

**सिंधमध्यें पेट्रोलचा शोध**—सिंधमध्यें पेट्रोल सापडण्याची शक्यता दिसून आली आहे. ह्या पेट्रोलच्या शोधार्थ नऊ अमेरिकनांचें एक टोळकें पहाणी करण्यासाठी उत्तर सिंधमध्यें दाखल झालें आहे.

**हिंदी उद्योगधंद्यांची गळचेपी**—हिंदी उद्योगधंद्यांवरील परदेशीयांचा ताबा नियंत्रित करण्यासाठी व शक्य तर तो दूर करण्यासाठी सरकारनें योजना करावी, असें सुचविणारा एक ठराव श्री. श्रीप्रकाश ह्यांनीं असेंब्लींत मांडला. सरकारतर्फे श्री. राजगोपालाचारी ह्यांनीं ठरावाच्या उद्देशाविषयीं सहानुभूति व्यक्त केल्यावर श्री. श्रीप्रकाश ह्यांनीं आपला ठराव परत घेतला.

**दि महाराष्ट्र बँक एक्झिक्यूटर अँड ट्रस्टी कं. लि.**—महाराष्ट्र बँकेची सबसिडिअरी कंपनी म्हणून वरील कंपनी १० एप्रिल, १९४६ रोजीं स्थापन झाली. व्यवस्थापत्र, इच्छापत्र, विश्वस्तपत्र, वगैरेंचीं कामें विश्वस्त म्हणून किंवा एक्झिक्यूटर म्हणून करणें हा तिचा उद्देश आहे. तिचें २½ लक्ष रुपयांचें विक्रीस काढलेलें सर्व भांडवल महाराष्ट्र बँकेनें घेतलेलें असून त्यापैकी १¼ लक्ष रुपये वसूल केलेले आहेत. ३१ डिसें. १९४६ अखेरचा कंपनी व्यवहार पहातां, तिच्या जमाखातीं २,५५४ रु. आहेत. त्यापैकी ॲक्सेप्टन्स फीज व कमिशनचे ३५० रु. आहेत. बाकी सर्व उत्पन्न व्याज खातीं मिळालेलें आहे. कंपनीवर जरूर तेवढाच खर्च टाकलेला असून ९३० रु. निव्वळ नफा दिसत आहे.

**नद्यांचीं पात्रें बदललीं**—संयुक्त प्रांतांतील पांच नद्यांनीं गेल्या कांहीं वर्षांत आपलीं पात्रें बदललीं आहेत. त्यांची पुन्हां मोजणी करून नकाशा त्याप्रमाणें बदलण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

**स्वदेशी रेल्वे इंजनें**—कांचरपारा येथें रेल्वे इंजनांच्या उत्पादनाचा कारखाना स्थापण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें ११ कोटि, ४० लक्ष रुपये मंजूर केले आहेत. सप्टेंबर १९४९ अखेर कारखान्याची उभारणी पुरी होईल अशी अपेक्षा आहे.


लग्नसमारंभास व मेजवानीसाठी

—रुपॉक्सचा—

शुद्ध साखरेचा केशरयुक्त

:: सुधारस ::

वापरा

बाटली किंमत २–८–०

घाऊक माल घेतल्यास स्वस्त देऊं.

मागविण्याचा पत्ता:—एम्पायर एजन्सीज,
९५२, सदाशिव, लक्ष्मीरोड, पुणें २.



दि रत्नाकर बँक लिमिटेड.

ऑफिसें:—१ कोल्हापूर, २ शाहुपुरी, ३ सांगली, ४ मिरज, ५ जयसिंगपूर.

चेअरमनः—नामदार बी. बी. पाटील, बी. ए., एलएल. बी. डेव्हलपमेंट मिनिस्टर, सांगली स्टेट.

| | रु. |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | २०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ३,२३,६०० |
| खेळतें भांडवल अंदाजें | ३५,००,००० |

—: अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात. :—











# अर्थ

बुधवार, ता. १२ फेब्रुवारी १९४७




प्रो. वा. गो. काळे


संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## सोलापुरांतील विणकर समाजाची आर्थिक पहाणी

अर्थशास्त्रीय वाङ्मयांत सर्वसामान्य तत्त्वांची सांगोपांग चर्चा करणारे जसे ग्रंथ असतात, त्याचप्रमाणें विशिष्ट विषयाचा किंवा एकाद्या प्रचलित प्रश्नाचाच फक्त उहापोह करणारे ग्रंथ असतात. या दोन प्रकारच्या ग्रंथांचा परस्परांशीं संबंध नसतो असा मात्र अर्थ नाहीं. किंबहुना सर्वसामान्य अर्थशास्त्रीय सिद्धांत एका विवक्षित क्षेत्रांत काय कार्य करीत असतात अगर आहेत हें तपशीलवार समजण्यासाठी दुसऱ्या प्रकारच्या ग्रंथांची आवश्यकता असतेच. निराळ्या शब्दांत असें म्हणतां येईल कीं अर्थशास्त्रीय सिद्धान्त आणि व्यवहार यांचा मेळ कितपत बसतो तें ताडून पहाण्यासाठी दुसऱ्या प्रकारच्या ग्रंथांची पुष्कळ जरूरी असते. अशा प्रकारच्या ग्रंथ-प्रकाशनाचें कार्य पुणें येथील गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स अँड एकानॉमिक्स करीत असते. आजवर या संस्थेतर्फे अशा प्रकारच्या ज्या अभ्यासिका प्रसिद्ध झाल्या त्यांतच आणखी एका उपयुक्त ग्रंथाची भर नुकतीच पडली आहे. संस्थेंत काम करणारे एक अभ्यासक श्री. आर. जी. काकडे एम्. ए., पीएच. डी. ( मुंबई ) यांनीं सोलापुरच्या विणकर समाजाचा आर्थिक आणि सामाजिक दृष्टीनें अभ्यास करून त्याविषयीं एक प्रबंध* लिहिला असून तो संस्थेतर्फे प्रकाशित करण्यांत आलेला आहे. प्रबंधाला संस्थेचे प्रमुख श्री. डी. आर. गाडगीळ यांनीं पुरस्कार जोडलेला असून त्यांच्याच मार्गदर्शनाखालीं प्रबंधाचें काम झालेलें आहे. हिंदुस्थानांतील एका नामांकित अर्थशास्त्रज्ञानें विषयाचा अभ्यास व पद्धति दर्शवून दिलेली असल्यामुळें, या विषयाचा सर्व बाजूंनीं अभ्यास झाला असला पाहिजे हें न सांगतांही समजण्यासारखें आहे. सोलापूरच्या सामाजिक व अर्थशास्त्रीय समिक्षणाचें जें काम संस्थेनें चालविलें आहे, त्याचा एक भाग म्हणून हा ग्रंथ प्रकाशित करण्यांत आलेला आहे.

सुमारें सवादोनशें पानांच्या या ग्रंथांत सोलापूरमधील विणकर समाजाचा प्रथमपासून इतिहास, विणकामाच्या धंद्याला लागणारा कच्चा माल, त्या धंद्याचा व्याप व संघटना, धंद्याची सुधारणा करण्याच्या दृष्टीनें उपाययोजना, विणकरांतील प्रमुख जात जी पद्मशाली तिची आर्थिक व सामाजिक परिस्थिति, या जातीचा धर्म, लोकभ्रम व वंश, तिची जातीय संघटना इत्यादी विषयांचा परामर्ष घेण्यांत आलेला आहे. इतक्या विस्तीर्ण व विविध विषयांची माहिती जमविण्यासच ग्रंथकाराला कितीतरी जुन्या-नव्या ग्रंथांचें परिशीलन करावें लागलें असून त्याचा पुरावा पृष्ठांच्या शेवटीं देण्यांत आलेल्या संदर्भावरून दिसून येतो. एका प्रकारची माहिती गोळा करण्याचें काम फारसें अवघड नसतें. पण इतस्ततः पसरलेल्या अशा साहित्यांतून योग्य निवड करणें, निवडलेलें साहित्य वर्णन-निरूपणाच्या स्वरूपांत मांडणें इत्यादि काम कष्टसाध्य असलें तरी बरेंच जिकीरीचें असतें. श्री. काकडे यांनीं हें काम अत्यंत कुशलतेनें पार पाडलेलें असून सामान्यतः रुक्ष वाटणारे अर्थशास्त्रीय प्रश्न सोप्या भाषेंत उलगडून दाखविले आहेत. ग्रंथांत एकंदर आंकड्यांचीं कोष्टकें ६३ असून अर्थशास्त्राच्या गणितागत अभ्यासपद्धतीचीं द्योतक अशीच तीं आहेत. कोष्टकें आणि प्रबंध हीं एकमेकांना पूरक आहेत. माहिती व तीवरून काढलेले निष्कर्ष यांची सांगड घालण्यांत आलेली आहे. निरूपणाला आंकड्यांच्या कोष्टकांचा भरपूर आधार दिलेला आहे; उलट आंकड्यांच्या कोष्टकावरून माहितीचे महत्त्वमापन करण्याचाही प्रयत्न केलेला आहे. केवळ अर्थशास्त्राच्या दृष्टीनें ग्रंथांतील सहावें, सातवें व आठवें हीं प्रकरणें गौणच मानावीं लागतील. कारण या प्रकरणांतून पद्मशाली समाजाचा धर्म, चालीरीति व जातीय संघटना यांचीच चर्चा करण्यांत आलेली आहे. तथापि कोणत्याही समाजाच्या अर्थशास्त्रीय व्यवहारावर इतर प्रकारचे आघात होत असतातच. त्या दृष्टीनें हीं प्रकरणें गौण असलीं तरी उपेक्षणीय आहेत असें मात्र नाहीं.

ग्रंथाचें शेवटचें प्रकरण निष्कर्षात्मक असून या विणकर समाजाच्या भवितव्याच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. पद्मशाली विणकर समाजाच्या अधोगतीचीं कारणें पुढीलप्रमाणें नमूद करण्यांत आलीं आहेत. या समाजाच्या उन्नतीच्या मार्गांत आत्यंतिक दारिद्र्य, अज्ञान, निरक्षरपणा, निकस अन्न, कर्जबाजारीपणा, आरोग्य-नाशक घरें आणि घाणेरड्या अगर आरोग्य घातक सवई इत्यादि अनेक जबरदस्त अडथळे आहेत. तथापि त्या सर्वांचें मूळ कारण दारिद्र्य हें असून, या समाजाची सांपत्तिक स्थिति सुधारल्याशिवाय इतर कोठल्याही सुधारणा अशक्य आहेत, असा निष्कर्ष काढण्यांत आलेला आहे. खरोखर हा निष्कर्ष काढण्यासाठीं येवढा खटाटोप करण्याची गरजच आहे कां असा प्रश्न सहजच उद्भवतो. ब्रिटिश राजवटींत जनतेचें दारिद्र्य पराकोटीला गेलेलें आहे हा सिद्धांत आज सर्वमान्य होऊन बसलेला आहे. मग अशा प्रकारच्या ग्रंथाची उपयुक्तता काय ? त्याचें उत्तर असें देतां येईल कीं सर्वमान्य सिद्धांत विशिष्ट क्षेत्रांत कोणता परिणाम घडवून आणीत आहेत हें नीट अवलोकन केल्याखेरीज, उपाययोजना नीटशी करतां येणें अशक्य होतें. विणकर समाजाचा हातमागाचा धंदा गिरण्यांच्या ( कापडाच्या व सुताच्या ) प्रत्यक्ष अप्रत्यक्ष स्पर्धेपुढें टिकाव धरूं शकत नाहीं. विणकरांचा धंदा टिकविण्यासाठी त्या धंद्याला गिरण्याविरुद्ध सवलतीचे संरक्षणच दिलें पाहिजे असें ग्रंथांत प्रतिपादन करण्यांत आलें आहे. हिंदुस्थानच्या औद्योगीकरणाच्या अनेक मोठमोठ्या योजना मांडण्यांत येत आहेत. या योजना प्रत्यक्ष अमलांत येण्याच्या संधिकालांत विणकामाचा धंदा बुडून जावयाचा नसेल तर वरील उपाययोजनेशिवाय दुसरा मार्ग सुचवितां येणें कठीण आहे. मद्रास प्रांताच्या कॉंग्रेस सरकारचें धोरण नवीन गिरण्यांच्या विरोधी आहे. परंतु हातमागाच्या धंद्याला प्रत्यक्ष संरक्षण देण्याच्या दृष्टीनें वरील धोरण केवळ एकांगीच म्हणावें लागेल.

ग्रंथकर्त्यानें हातमागाला सवलतीचें संरक्षण देण्याची सूचना केली आहे. ती संधिकालापुरती आहे. पुढेंमागें हिंदुस्थानचें औद्योगिकरण पूर्ण झाल्यावर हे विणकर गिरण्यांतून काम करूं लागतील अशा प्रकारची उपपत्ति वरील सूचनेंत गृहीत धरलेली दिसते. पण हिंदुस्थानच्या औद्योगिक भरभराटीला आर्थिक मंदीची झळ लागणार नाहीं असें मानल्याशिवाय वरील उपपत्ति सयुक्तिक वाटणार नाहीं. उत्पादन साधनांच्या खाजगी मालकीवर आधारलेली अर्थव्यवस्था आर्थिक अरिष्टांची आपत्ति टाळूं शकत नाहीं असा अनुभव जगभर आलेला आहे. अमेरिकेसारख्या पुढारलेल्या देशांत सुद्धां या प्रश्नाची जोरानें चर्चा चालू आहे. मागील अनुभव जमेस धरावयाचा तर या बाबतींत आशावादाला फारशी जागा आहे असें म्हणतां येत नाहीं. तथापि हा प्रश्न ग्रंथाच्या कक्षेच्या बाहेर असल्यामुळें त्याचा उहापोह करण्याचें कारणच नाहीं. हातमाग विरुद्ध गिरणी हा वाद देशांत जास्त पेटला तर कापडाच्या गिरण्यांचा धनिक वर्ग

* "A Socio-Economic Survey of Weaving Communities in Sholapur."

ले.:—आर. जी. काकडे, एम. ए., पीएच. डी. किं. १० रु.

सवलतीच्या संरक्षणाला कितपत मान तुकवील हाही एक प्रश्नच आहे. सवलतींचे संरक्षणाचा उपाय सोडून दिला तर हातमागाच्या कापडाला बाजारपेठा उपलब्ध करून देण्यासंबंधीं केलेल्या सूचना व्यवहार्य व उपयुक्त असून त्या अमलांत आल्यावर विणकराच्या जगण्याच्या धडपडीला थोडीबहुत मदत होईल यांत शंका नाहीं.

सारांश, पुस्तकांतील माहिती व त्यावरून काढलेले निष्कर्ष बहुशः पुरोगामी जनतेला मान्य होण्यासारखेच आहेत. प्रश्न आहे तो उपाययोजनेच्या मागे उभे राहून त्या नेटानें अंमलांत आणण्याचें धैर्य प्रांतिक अगर मध्यवर्ती सरकार दाखवितील कीं नाहीं हाच आहे.

# मोटार-वहातुकीचें राष्ट्रीयकरण

## कार्यक्षमता आणि जनतेचें हित, ह्यांस सरकारी मालकी आवश्यकच आहे काय ?

लेखकः—एक तज्ज्ञ निरीक्षक

मोटार–वहातुकीच्या धंद्यांत जास्त कार्यक्षमता येऊन तो वाढीस लागावा व त्या धंद्यांतून मिळणाऱ्या फायद्याचा उपयोग जनतेस व्हावा, तसेंच मोटारी, रेल्वे व आगबोटी यांचें संलग्नीकरण होऊन परस्परांत आर्थिक दृष्ट्या तोट्याची चढाओढ होऊं नये या उच्च हेतूनें प्रेरित होऊन मुंबई सरकारनें प्रांतांतील ( उतारू ) मोटार–वहातुक स्वतःच्या मालकीची करण्यासंबंधींची एक योजना ता. १४ जानेवारी १९४७ रोजीं गॅझेटमध्यें तपशीलवार प्रसिद्ध केली आहे. सदर योजनेंत ७५ टक्के भांडवल प्रांतिक सरकारचें असून २५ टक्के रेल्वेचें राहणार आहे. रेल्वे-अभावीं आगबोटींना २० टक्के रेल्वेच्या हिश्यापैकी देण्यांत येणार आहे. सध्यां वहातुकीचा धंदा करीत असलेल्यांना मात्र यांत बिलकूल स्थान नाहीं. या योजनेनुसार मुंबई प्रांताचे १४ विभाग ( झोन्स ) करण्यांत आले असून त्या प्रत्येक विभागांत एक एक कंपनी स्थापन करण्यांत येणार आहे. सर्व वहातुकीची व्यवस्था व नियंत्रण मुंबई सरकारतर्फे नेमण्यांत येणाऱ्या एका स्टॅट्यूटरी बोर्डाकडे राहील. पुढील तीन वर्षांत हा धंदा मोटार मालकांकडून हळू हळू सरकार ताब्यांत येईल. त्यावेळीं ज्यांचे परवाने संपले नसतील त्यांनाच अगदीं अल्पशी रक्कम नुकसान-भरपाई म्हणून देण्यांत येणार असून त्यांचेकडून सन १९४३ नंतरच खरेदी केलेल्या मोटारी सरकार विकत घेईल. याव्यतिरिक्त मोटार मालकांना जादा सवलती दिल्या जाणार नाहींत. वरील झोनल कंपनींतील उच्च नोकर वर्गाची निवड पब्लिक सर्व्हिस कमिशनमार्फत करण्यांत येणार आहे. असा त्या योजनेचा थोडक्यांत सारांश आहे.

### रस्ते व त्यांवरील वहातुक

मुंबई सरकारच्या वरील योजनेवर मत देण्यापूर्वी हिंदुस्थानांतील रस्ते व त्यांवरील वहातुक यांचाहि अभ्यासपूर्वक विचार करणें जरूरीचें आहे. हिंदुस्थानांत रस्तेबांधणीस जरी शेरशहाच्या वेळेपासून सुरवात झाली असली तरी पाश्चिमात्य राष्ट्रांच्या मानानें हिंदुस्थान रस्त्यांच्या बाबतींत दसपटीनें मागें आहे, व त्या मानानें त्यावरील मोटारींचें प्रमाणहि दरलाख लोकवस्तीमागें हिंदुस्थानांत ५०, इंग्लंडमध्यें ६,४००, व अमेरिकेंत २४,००० असें असल्यास नवल नाहीं. हिंदुस्तानांत मोटार–वहातुकीचा धंदा अगदीं बाल्यावस्थेंत असून त्यास वाढण्यासही बराच वाव आहे. मध्यवर्ती व प्रांतिक सरकारनें मिळून तयार केलेल्या रस्तेबांधणीच्या योजनेप्रमाणें पुढील १५ वर्षांत एक लाख मैल लांबीचे नविन रस्ते तयार केले जाणार आहेत; याचा अर्थ असा कीं सात खेडेगांवांना फक्त एक मैल लांबीचा नवीन रस्ता वाट्याला येणार आहे. रशियानें अवघ्या एका वर्षांत ३० हजार मैल लांबीचे रस्ते तयार केले त्यामानानें येथील प्रगति अगदीं मंद आहे. हिंदुस्थानांतील बहुजनसमाज सात लाख खेड्यां-मध्यें आहे. त्याची औद्योगिक, शैक्षणिक व आरोग्य दृष्ट्या सुधारणा करावयाची असल्यास खेडीं व शहरें हीं एकमेकांस लवकर सांधलीं गेलीं पाहिजेत व त्यासाठी नवीन रस्ते आणि त्यावरील वहातुकीचीं साधनें यांचीहि फार झपाट्यानें वाढ झाली पाहिजे. खुला व्यापार व चढाओढ हीं कोणताहि धंदा वाढीस लागण्याचे दृष्टीनें महत्त्वाचीं अंगें आहेत; व कडक नियंत्रण न घालतां त्यास उत्तेजन दिलें असतां धंदा लवकर वाढीस लागतो. मात्र त्या धंद्याची मालकी सरकारकडे जाण्याऐवजी खाजगी मालकांकडेच असणें इष्ट आहे.

सार्वजनिक उपयुक्ततेचे धंदे राष्ट्राच्या मालकीचे करण्यास कोणाचाहि विरोध नसतो, कारण त्या धंद्यांतून मिळणारा फायदा जनतेच्या उपयोगी पडतो. मात्र अशा धंद्याची संपूर्ण वाढ झालेली पाहिजे. त्याचप्रमाणें खाजगी मालकीचे मक्तेदारी धंदे सरकारनें ताब्यांत घेतल्यास फक्त ज्यांत मालकींत बदल होतो असे टेलिफोन कंपन्या, इलेक्ट्रिक कंपन्या, [illegible] सारखे धंदे राष्ट्रीय मालकीचे होणें जरूरीचें आहे. बाकीच्या इतर धंद्यांची सर्वांगीण वाढ होण्याचे दृष्टीनें त्यामध्यें काय सुधारणा करतां येतील याचा विचार करून त्या दृष्टीनें जरूर तीं नियंत्रणें बसवावींत. सध्यांच्या मोटार वहातुक धंद्यासहि हेंच तत्त्व लागूं पडेल.

स्वस्तपणा आणि कार्यक्षमता हेंच वहातुकीचें अंतिम ध्येय आहे व त्या-साठीं वहातुकीच्या सर्व साधनांत चढाओढ असली पाहिजे. मात्र ती आर्थिक दृष्ट्या तोट्याची नसावी म्हणून सर्व साधनांची सांगड घालावयास पाहिजे. पण कोणत्याहि एका साधनाचा बळी देऊन तें साध्य करून घेऊं नये. रस्तावहातुकींत रेल्वे अगर आगबोटींना आर्थिक भाग देणें अन्यायाचें आहे. रेल्वेला जर आपण जनतेचे सेवक आहोंत अशी कोणी जाणीव करून दिली असेल तर ती मोटार–वहातुकीनेंच होय, व त्याचप्रमाणें किनाऱ्यावरील आगबोट कंपन्यांची व्यवस्थाहि माणुसकीला लाजविणारी आहे. वहातुकीच्या कोणत्या साधनाचा उपयोग करावयाचा हा अधिकार जनतेचा आहे. १०० मैलांपेक्षा जास्त लांब मोटारीनें वहातुक करूं नये असा कायद्याचा निर्बंध घालणें अन्यायाचें आहे. हिंदुस्थानच्या औद्योगिक वाढीचें बरेचसें श्रेय मोटार–वहातुकीस आहे. देशाच्या उत्पन्नाच्या दृष्टीनेंहि पाहतां मध्यवर्ती सरकारला मोटारी व टायर्सवरील जकाती आणि पेट्रोल कर यांच्या रूपानें ९ कोटींच्यावर उत्पन्न मिळतें व याशिवाय मोटार कंपन्याकडून मिळणाऱ्या इन्कम–टॅक्सचें उत्पन्न निराळेंच ! मुंबई प्रांतासहि मोटारकराच्या रूपानें ४० लाख व पेट्रोलकर म्हणून ११ लाख रुपये इतकें उत्पन्न मिळतें. तेव्हां रेल्वेऐवजीं लोक मोटारीनें प्रवास करणें पसंत करतात म्हणून देशाचें उत्पन्न घटतें असा जो प्रवाद आहे तो खोटा आहे. म्हणून मोटार वहातुकीस बळी देऊन रेल्वेचें संर-क्षण करूं नये.

### सुधारणेसाठी निर्बंध घाला

मुंबई सरकारच्या नवीन योजनेंत वहातुक कोणत्या दरानें केली जाणार याचा कोठेंहि उल्लेख नाहीं. युद्धापूर्वी सध्यांच्या मोटार–मालकांनीं वहातुक अत्यंत स्वस्त दरानें दिली होती ही गोष्ट सत्य आहे. सरकार ज्या हेतूसाठी हा धंदा ताब्यांत घेऊं इच्छितें त्या सर्व गोष्टी, मोटार–वहानांचा कायदा संपूर्णपणें अंमलांत आणल्यास, साध्य होणाऱ्या आहेत. त्या कायद्यान्वये वहातुकीचे दर ठरविण्याचे अधिकार प्रांतिक सरकारकडे ठेवण्यांत आले असून, नियमितपणा, ओव्हरलोडींग, भरमसाट वेग, प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी विमा, हाताखालील नोकरवर्गाचे बाबतींत कामाचे तास, सुट्या वगैरे सर्व बाबतींत तरतूद करण्यांत आलेली आहे. सरकारला दारूबंदीसारख्या योजनांमुळें जी तूट येणार आहे ती भरून काढण्या-साठी पैसा पाहिजे हें मान्य आहे, तरी त्यासाठी सध्यांचे मोटार व पेट्रोल करांत वाढ करावी. सरकारच्या नवीन योजनेंत फायदा कितपत होईल व कार्यक्षमता किती वाढेल याबद्दल मात्र शंका वाटते. तेव्हां वरील सर्व गोष्टींचा विचार करतां सरकारनें या धंद्याचें राष्ट्रीयकरण करण्यांत इतकी घिसाडघाई करूं नये. मात्र दरम्यानचे काळांत हा धंदा सध्यां ज्या पद्धतीनें चालत आहे त्या पद्धतीनें चालूं न देतां त्यावर योग्य त्या सुधारणांचे दृष्टीनें नवीन निर्बंध घालावेत. युद्धकालांत झालेल्या फायद्यांतून एक टक्याचाहि खर्च जनतेसाठी मोटार–मालकांनी केला नाहीं. तेव्हां त्यांचेवर पुढील सुधारणा सक्तीनें लादल्या गेल्या पाहिजेत.

(१) प्रत्येक रस्त्यावर अगर जिल्ह्यांत एकेक कंपनी 'स्थापन करावी. त्यामध्यें प्रांतिक सरकारचा एक प्रतिनिधि बोर्डावर घ्यावा व सल्लागार मंडळ हें बाहेरच्या सदस्यांचें असावें.

(२) खर्चाचें व फायद्याचें प्रमाण हें ठराविक असावें.

(३) एकूण फायद्यापैकीं २५ टक्के गंगाजळी, २५ टक्के प्रांतिक सरकारला, २५ टक्के नोकरवर्गास बोनस म्हणून व उरलेला २५ टक्के डिव्हिडंड फंड म्हणून असावे.

(४) गाडीवर असणाऱ्या बॉडर्यांची बांधणी ठराविक साच्यांची असावी व जनतेसाठी वेटिंग रूम्स वगैरे सर्व सोयी असाव्यात. त्याचप्रमाणें नोकर वर्गास प्रॉव्हिडंट फंड, हक्काची रजा इत्यादि सवलती द्याव्यात.

वरील गोष्टींची अंमल बजावणी उत्तम पद्धतीनें झाल्यास जनतेचें, सरकारचें व मोटार मालकांचें हित होऊन धंदाहि वाढीस लागेल.

## स्फुट विचार

### देणेकऱ्याचा घेणेकऱ्यास इशारा!

ग्रेट ब्रिटनमध्यें हिंदी येणें तुंबून राहिलें आहे, त्याच्या फेडीसंबंधीं हिंदी व ब्रिटिश सरकार ह्यांचेमध्यें वाटाघाटी चालू आहेत. ह्या वाटाघाटी लवकर पुऱ्या होणें ग्रेट ब्रिटनच्या दृष्टीनें आवश्यक आहे. कारण, त्या संबंधांत ग्रेट ब्रिटननें अँग्लो-अमेरिकन करारांत स्वतःवर बंधन घालून घेतलेलें आहे. ह्या कराराच्या दिवसापासून बारा महिन्यांचे आंत, म्हणजे १५ जुलै १९४७ पूर्वी ग्रेट ब्रिटननें आपल्या देण्याविषयीं कांहींतरी निकाल लावणें आवश्यक आहे. ग्रेट ब्रिटनला इतर राष्ट्रांचेंहि देणें द्यावयाचें असतें. हिंदुस्थानाचें देणें हा एक त्याचा अंश आहे, तेव्हां नुसतें हिंदुस्थानाचें देणें मागविण्याकडे लक्ष देऊन ग्रेट ब्रिटनला चालणार नाहीं, असें "एकॉनॉमिस्ट" ह्या ब्रिटिश आर्थिक वजनदार वृत्तपत्रानें आग्रहपूर्वक सांगितलें आहे. ग्रेट ब्रिटनला त्याच्या आजच्या आंतर-राष्ट्रीय देण्या-घेण्याच्या परिस्थितींत ताण न बसता जितके पौंड हिंदुस्थानास उपलब्ध करून देतां येतील, त्यापेक्षां अधिक रकमेच्या मालाची खरेदी हिंदुस्थान त्या देशांत करूं लागला आहे, आणि ही प्रवृत्ति अशीच टिकली तर ती ग्रेट ब्रिटनच्या सोईची नाहीं असें सांगण्यांत येत आहे. हिंदुस्थानचें येणें त्यानें कमी रकमेवर तोडण्यास तयार व्हावें, हा त्यांतील खरा मुद्दा आहे. शक्य तितक्या कमी रकमेवर हें कर्ज तुटावें व त्याची परतफेड अगदीं लहान हप्त्यांनीं व्हावी, असा "एकॉनॉमिस्ट" चा आग्रह आहे. ब्रिटिश आयात-निर्गतीच्या आजच्या हिशोबांत जुनें देणें देण्यास ग्रेट ब्रिटनला अवसरच उरत नाहीं; तेव्हां कर्जदाराच्या सोईनेंच सावकारानें आपली वसुली केली पाहिजे, असें कर्जदाराचें सांगणें आहे. हिंदी-ब्रिटिश वाटाघाटी निष्फळ ठरल्या तर ग्रेट ब्रिटनला कर्जफेड नाकारण्याचें धोरण नाइलाजानें पत्करावें लागेल असा इशारा "एकॉनॉमिस्ट"नें दिला आहे. ग्रेट ब्रिटनच्या स्वतःच्या संरक्षणासाठीं व इतर सावकारांच्या हितासाठीं हें करणें क्रमप्राप्तच ठरणार आहे असें तें पत्र बजावून सांगत आहे!

### किंमतींच्या नियंत्रणाची प्रमाणबद्धता-सल्लागार बोर्डाची स्थापना

मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांच्या नियंत्रणाखालील जिनसांच्या किंमती ठरविण्याकरितां हिंदुस्थान सरकारनें एक कमॉडिटिज प्राइसेस बोर्ड स्थापन केलें आहे. एकादा जिन्नस नियंत्रणाखालीं आणावा किंवा नाहीं, हेंहि प्रस्तुत बोर्ड सुचवील. टारिफ बोर्डाप्रमाणेंच ह्या बोर्डाचीं मतें 'सल्ला' ह्या स्वरूपाचींच रहाणार असलीं, तरी त्या सल्ल्यास सरकार अग्रपूर्व मान देईल, अशीच वाजवी अपेक्षा आहे. टारिफ बोर्ड आपलें मत बनविण्यापूर्वी हितसंबंधी लोकांच्या उघड रीतीनें साक्षी घेतें तसें, कमॉडिटीज प्राइसेस बोर्ड करणार नाहीं. कपाशीसारखी पैसा निर्माण करणारीं व गहूं किंवा तांदूळ ह्यासारखीं धान्याचीं पिकें ह्यांच्या किंमतींत प्रमाणबद्धता हवी, त्याचप्रमाणें शेतीचें उत्पादन आणि औद्योगिक उत्पादन ह्यांच्या किंमतींतहि गैरवाजवी विषमता असून भागणार नाहीं. सध्या, किंमती निश्चित करतांना विशिष्ट बाबीपुरताच विचार केला जातो, सर्वांगीण बाजूंनीं विचार स्वाभाविकपणेंच होत नाहीं. हा दोष नाहींसा व्हावा, ह्या दृष्टीनें क. प्रा. बोर्ड स्थापन केला जात आहे. सरकार निर्णय करण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घेते, ही गोष्ट सरकारी निर्णयास जनतेची मान्यता सुलभतेनें मिळवून देण्यास साहाय्यकारक होईल, अशी सरकारची अपेक्षा आहे. मि. ए. डी. गोरवाला, आय. सी. एस. हे ह्या बोर्डाचे अध्यक्ष असून प्रा. धनंजयराव गाडगीळ त्याचे एक सभासद आहेत. दुसऱ्या सभासदाचें नांव अद्याप प्रसिद्ध झालेलें नाहीं. बोर्डाची मुदत तूर्त तीन वर्षांची असून त्याची कचेरी दिल्ली येथें रहाणार आहे. बोर्डाचे अध्यक्ष व प्रा. गाडगीळ ह्यांची धान्य पुरवठ्याबाबत कामगिरी आणि अनुभव हीं प्रसिद्धच आहेत. त्यांच्या सल्ल्याची अंमलबजावणी कितपत यशस्वी रीतीनें होईल आणि प्रांतांचीं व संस्थानांचीं सरकारें ह्यांचें त्याबाबत हार्दिक सहकार्य किती प्रमाणांत मिळवतां येईल, हाच काय तो महत्त्वाचा प्रश्न आहे.

### चेक व ड्राफ्ट ह्यांतील भेद नाहींसा करणारी कायद्यांतील दुरुस्ती

निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टांत दुरुस्ती करणारें एक बिल फडणवीस मि. लियाकत अलीखान ह्यांनीं मध्यवर्ती असेंब्लींत मांडलें आहे. ड्राफ्ट व चेक्स हे समान मानले जावे, हा त्या बिलाचा उद्देश आहे. मारुती सन्यासी लिंगम विरुद्ध एक्सचेंज बँक ऑफ इंडिया अँड आफ्रिका लि., ह्या मुंबई हायकोर्टाच्या निवाड्याचा सारांश "अर्था" च्या ता. २४ जुलै १९४६ च्या अंकांत देण्यांत आलेला आहे. बँकेनें आपल्या गिऱ्हाइकांच्या वतीनें चेकची रकम निष्काळजीपणा न दाखवितां वसूल केली तर चेकमध्यें दोष जरी आढळला तरी बँक नुकसान भरपाई करण्यास बांधलेली नाहीं, असें ॲक्टाचें १३१ वें कलम सांगतें. बँकेस ही दिलेली सवलत चेकला लागू आहे, डिमांड ड्राफ्टला नाहीं, असा अभिप्राय हायकोर्टानें व्यक्त केला होता. कारण ६ व्या कलमांतील चेकच्या वर्णनांत बँकेच्या एका कचेरीनें तिच्याच दुसऱ्या कचेरीवर काढलेला ड्राफ्ट बसूं शकत नाहीं. अशा प्रकारच्या ड्राफ्टला क्रॉस्ड चेक्सबाबत कायदा लागू व्हावा ह्या दृष्टीनें ब्रिटिश कायद्यांत १९३२ सालीं दुरुस्ती करण्यांत आली तशीच दुरुस्ती हिंदी निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट कायद्याच्या १३१ व्या कलमांत करण्यांत यावी असा अभिप्राय न्यायमूर्ति कोयाजी ह्यांनीं व्यक्त केला होता.

### महाराष्ट्रांतील मोठे उद्योगधंदे

#### श्री. पेंडसे ह्यांची पहाणी—सहकार्याची विनंति

"अर्था"चे एक लेखक व हितचिंतक श्री. ब. पां. पेंडसे, बी. ए. (ऑनर्स), बी. कॉम., सर्टि. ए. आय. आय. बी., हे आपला व्यवसाय संभाळून मुंबई विश्वविद्यालयाच्या एम. ए. च्या परीक्षेसाठीं "महाराष्ट्रांतील मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंदे" ह्या विषयावर एक निबंध लिहीत आहेत. उद्योगधंद्यांची स्थापना करतेवेळीं त्यांचें अनिष्ट केंद्रीकरण होऊं नये, ह्या दृष्टीनें काळजी घ्यावी लागते. हिंदुस्थान सरकारनें ह्या प्रश्नाकडे आतां लक्ष पुरविण्यास प्रारंभ केला आहे. तथापि, प्रत्येक विभागाची औद्योगिक प्रगति, तेथील वाढीस असलेला वाव आणि तेथील नैसर्गिक साधनांची अनुकूलता ह्या दृष्टीनें तपशीलवार पहाणी झाल्याविना सरकारचें उद्दिष्ट साध्य होणार नाहीं. महाराष्ट्रापुरती अशी पहाणी करण्याचें श्री. पेंडसे ह्यांनीं योजिलें आहे आणि त्यासाठीं त्यांनीं महाराष्ट्रांतील कारखानदारांकडे एक प्रश्नपत्रिका धाडली आहे. धंद्याचें स्वरूप, कच्चा माल, उत्पादन, विक्री, भांडवलाची व्यवस्था, कामगार, इत्यादि बाबत श्री. पेंडसे ह्यांना माहिती हवी आहे. ही माहिती स्वतंत्रपणें प्रसिद्ध केली जाणार नाहीं; फक्त तक्ते तयार करण्याकडे व निष्कर्ष काढण्याकडे तिचा उपयोग केला जाईल, असा त्यांनीं खुलासा केला आहे. महाराष्ट्रांतील कारखानदारांनीं तपशीलवार माहिती सत्वर पुरवून एका महत्त्वाच्या पहाणीस सहाय्य जरूर करावें.

## मुंबई—कूळ—कायदा

### लॉ ॲकॅडेमीचा नवा ग्रंथ*

मुंबई कूळ कायद्याचें तपशीलवार विवेचन करणारा हा ग्रंथ पुणें येथील लॉ ॲकॅडेमीनें तयार केला असून तो आतां प्रसिद्ध झाला आहे. कूळ कायदा कित्येक ठिकाणीं अनेक वर्षें अंमलांत असूनही, तेथील लोकांना कायद्याच्या अस्तित्वाचीहि माहिती नाहीं, अशी परिस्थिति आहे. पार्लमेंटरी सेक्रेटरी श्री. कुंटे ह्यांस ठाणें जिल्ह्यांत हा अनुभव नुकताच आला. लॉ ॲकॅडेमीनें प्रस्तुत ग्रंथ काळजीपूर्वक तयार केला असून ४ जानेवारी १९४७ चे कानू व नमुने हेहि त्यांत समाविष्ट केल्यानें त्याची उपयुक्तता व ताजेपणा हीं निर्विवाद झालीं आहेत. प्रस्तुत कायद्याचें स्थूल विवेचन खालीं दिलें आहे, त्यावरून कायद्यानें जमीनमालक व कुळें ह्यांचे हक्क व जबाबदाऱ्या ह्यांकडे योग्य लक्ष कसें पुरवलें आहे तें दिसून येईल.

**संरक्षित कुळें**—१९३९ सालीं हा कायदा जेव्हां प्रथम तयार झाला तेव्हां 'संरक्षित' कुळें या कायद्यानें निर्माण केल्याबद्दल बरीच हाकाटी करण्यांत आली. परंतु संरक्षित कुळांच्या हक्कांची व जबाबदाऱ्यांची सूक्ष्मपणानें छाननी केली तर संरक्षित कुळांस दिलेल्या हक्कांपेक्षां त्यांच्यावर टाकलेल्या जबाबदाऱ्यांची संख्या जास्त असल्याचें आढळून येईल. जरी प्रथमदर्शनी संरक्षित कुळांच्या जमिनींचा ताबा घेतां येणार नाहीं असें म्हटलें असलें तरी त्यास अपवाद सांगितले आहेत. ते पहातां सर्वसाधारणपणें जमीनमालक आपल्या जमिनी ज्या कारणाकरितां आतांपर्यंत कुळांकडून काढून घेत आले आहेत तींच तीं कारणें आहेत असें आढळून येईल. अशा रीतीनें संरक्षित कुळाला आपला ताबा बिलकुल न जाण्याबद्दल या कायद्यानें संरक्षण दिलें आहे अशी जी समजूत आहे ती चुकीची आहे हें दिसून येईल. फक्त पूर्वी जमीनमालकानें कायदेशीर मुदतीची नोटीस कुळांस दिली म्हणजे त्यास कूळ-हक्क संपवितां येत असत व जमिनीचा ताबा मिळवितां येत असे. परंतु आतां त्यानें कलम ५ व ७ मधील गोष्टी मामलेदारासमोर शाबीत केल्या म्हणजे पूर्वीप्रमाणें कुळांचा जमिनींचा ताबा जाणार आहे. शिवाय १९४६ च्या दुरुस्ती कायद्यानें कलम ५,६,१०,११,१२ हीं कलमें सर्वसाधारण कुळांच्याहि बाबतींत लागू केलेलीं असल्यामुळें संरक्षित कुळांना फक्त ७,८ व ९ या अन्वयें सांगितलेल्या बाबी म्हणजे मालकानें स्वतःकरितां ताबा घेतल्यावर जर त्याप्रमाणें जमिनीचा उपयोग केला नाहीं तर मिळणारा परत कबजा व नुकसानी, सुधारणांबद्दलची नुकसानभरपाई व वारसहक्कानें संरक्षित कुळवहिवाट चालू ठेवणें या विशेष अशा दिलेल्या दिसतात.

**कुळांचे सामान्य हक्कः**—सामान्य कुळांस जवळ जवळ संरक्षित कुळांइतकेंच संरक्षण या नवीन दुरुस्त कायद्यानें देण्यांत आलें आहे. त्यामुळें दहा वर्षेपर्यंत मुदतीच्या सबबीवर जमीनमालकांना कुळांकडून ताबा काढून घेतां येणार नाहीं. तसेंच खंडबाकी थकल्यास कोर्टाकडून नोटीस येतांच ती भरल्यास ताबा पूर्ववत् चालू रहाणार आहे. शिवाय खंडाची रक्कम तिसऱ्या अगर चौथ्या हिश्शाहून जास्त नाहीं अशी नियमित केली जाणार असून तीहि जास्त वाटल्यास ती कमी करून घेण्याकरितां मामलेदारकडे अर्ज करण्याची सवलत त्यांना देण्यांत आली आहे व आतां कुळांकडून खंडाशिवाय अन्य कोणतीहि रक्कम अगर चाकरी घेण्याचा जमीनमालकास हक्क नाहीं. त्याचप्रमाणें कुळानें लावलेलीं झाडें व त्यानें बांधलेल्या घराखालील जागा याबाबत विशेष हक्क देण्यांत आलेले आहेत. यापुढें खंड मिळाल्याबरोबर जमीनमालकानें ठरीव नमुन्यांत पावती द्यावयास पाहिजे. जर कुळांकडून जमिनीचें नुकसान होतें आहे असें जमीनमालकास वाटत असेल तर एक वर्षाची नोटीस त्यांस देऊन सुधारणा करण्यास कुळांस संधि मिळणार आहे. अशा प्रकारें नियमित खंड, खंडाची पावती, थकबाकी भरण्याची संधि, जमिनीची नुकसानी दुरुस्त करण्यास अवसर, ठेवी, बिगार, वगैरेस बंदी, व दहा वर्षें कुळवहिवाटीची खात्री, इतक्या सवलती या कायद्यानें सर्वसामान्य कुळांना मिळणार आहेत.

**जमीनमालकांचा हक्कः**— या कायद्याविरुद्ध जमीन मालकांनीं आपली नुकसानी झाली व सर्व हक्क नाहींसे झाले अशी फार मोठी हाकाटी केली. परंतु या कायद्याचीं कलमें ५ व ७ हीं पाहिलीं असतां त्यांचा कुळांकडून जमीन काढून घेण्याचा हक्क बिलकुल नाहींसा केलेला नाहीं हें दिसून येईल. फक्त पूर्वी लहरीखातर सुद्धां जमीनमालकांना कुळवहिवाट रद्द करतां येत होती ती आतां पुराव्यानिशीं सिद्ध करून रद्द करतां येईल. जमीन मालकांची दुसरी तक्रार खंडासंबंधीची आहे; परंतु त्या बाबतींतहि जरी कायद्यानें एक तृतीयांशाची कमाल मर्यादा घातली असली तरी खंड खात्रीलायक मिळण्याची सोय कायद्यानें करून ठेवली आहे. कारण कलम ५ प्रमाणें, कूळ थकबाकी देण्यास चुकलें अगर चालू खंड वेळेवर न देईल तर त्याचा कुळवहिवाटीचा हक्क नष्ट होणार आहे. जरी मालकांना तिसऱ्या हिश्याहून जास्त मिळणार नाहीं तरी शेतकीचा सर्व खर्च कुळानें करावयाचा आहे आणि प्रत्यक्ष पिकाची मोजणी करून घेण्याचा हक्क कानू ३ प्रमाणें देण्यांत आला आहे. त्यामुळें पूर्वी जरी मालकांना निम्मा हिस्सा ठरत असे तरी तो प्रत्यक्षांत कधींच मिळत नसे असा जमीन मालकांचा अनुभव आहे. आतां पाटीलतलाठ्यांकडून पंचनामा करण्याची सोय केली असल्यामुळें निदान तिसऱ्या हिश्यांत तरी कांहीं कमी मिळणार नाहीं.

**कायद्याचा निष्कर्षः**—एकंदरींत या कायद्यानें जादा हक्क व सवलती कुळांना मिळून त्यांना जमिनींतून काढून टाकतां येणार नाहीं व त्यांच्याकडून तिसऱ्या हिश्याहून जास्त खंड आपणांस मिळणार नाहीं आणि मिळलेल्या खंडांतून पट्टी मात्र भागविली पाहिजे व क्वचित पिकाचा वांटा मिळणार नाहीं अशी भीति सर्वसाधारण जमीनमालकांच्या मनामध्यें उत्पन्न झाली असल्यामुळें व जमीन विकावयाची असल्यास ती प्रथम कुळासच देऊं केली पाहिजे अशी योजना कायद्यांत केलेली नसल्यामुळें या जमिनी मोठमोठ्या सावकार मांडवलदारांस व कारखानदारांस मिळण्याचा संभव आहे. असे मांडवलदार जमीन स्वतः करण्याकरितां अगर बिगरशेतकीचे कारणाकरितां ताब्यांत घेतील व त्यांतील हल्लीं असलेल्या कुळांस निव्वळ मजूर म्हणून रहावें लागेल अशी शक्यता दिसते.

* मुंबई-कूळ-कायदा, पृ. सं. १७५. किं. २ रु. ८ आ. लॉ ॲकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २.

**डुप्लीकेटर्स** घरगुती छपाईचें उत्कृष्ट यंत्र !

फक्त एका वर्षाच्या प्रिंटिंगच्या खर्चांत विकत मिळणारें, सोपें व सुटसुटीत, हरकामी; लहानमोठे व्यापारी, कारखानदार, शिक्षण व इतर संस्था, क्लब्ज वगैरेंना नेहमीं लागणारें प्रिंटिंगचें काम या यंत्रावर सुबक रीतीनें मिळतें: कॅश मेमोज, बिल फॉर्मस्, सर्क्युलर्स, दर पत्रकें, हँडबिल्स, परीक्षेचे पेपर्स वगैरे सर्व प्रकारचीं व सर्व भाषेंतील प्रिंटिंगचीं कामें या यंत्रावर होतात.

अधिक माहिती व किंमतीबद्दल आजच लिहा.

कारखानदार:—

**शेवडेज कॅमेरा वर्क्स लि.**

ठळकवाडी, बेळगांव

## पडत्या पाण्याच्या शक्तीचें विजेंत रूपांतर

### वेगवेगळया प्रांतांतील योजनांचा परामर्श

दिवसेंदिवस कोळसा व तेल यांच्या दुर्भिक्ष्यामुळें व महागतेमुळें जलशक्तिजन्य विजेचें महत्त्व वाढत चाललें आहे. अणुशक्तीसारखें दुसरें एकादें प्रभावी व अधिक स्वस्त साधन नागरी व्यावहारिक सामान्य जीवनास उपलब्ध झालेलें नाहीं तोंपर्यंत विजेचें हें महत्त्व कायम रहाणार आहे. या दृष्टीनें हिंदुस्थानांत जलशक्तिजन्य ( हायड्रो इलेक्ट्रिक ) वीज उत्पादनाचीं केंद्रें कोठें आहेत व कोठें अधिक स्थापन करतां येणें शक्य आहे, हें पहाणें फायद्याचें होईल.

हिंदुस्थानांतील फार मोठी लोकसंख्या खेड्यापाड्यांत राहते, व ती सर्वस्वी शेतीच्या उत्पादनावर अवलंबून आहे. यामुळें हिंदुस्थानच्या शेतीला फार महत्त्व आहे; व शेती सुधारणेला प्रथम प्राधान्य देणें भाग आहे. शेतीच्या सुधारणेस पहिली मोठी अडचण पाणीपुरवठ्याची पडते. हिंदुस्थानांत पाऊस कमी पडतो असें नाहीं. पण तो पडतो तेथें अतोनात पडतो व नाहीं तेथें अजिबात पडत नाहीं. याशिवाय तो सामान्यतः पावसाळ्याच्या दिवसांत जो काय पडेल तेवढाच. त्यामुळें पावसाळ्यांत हिंदुस्थानांतील बहुतेक नद्या तुडुंब भरून वाहतात नि उन्हाळ्यांत कोरड्या ठणठणीत पडतात. अशा रीतीनें हिंदुस्थानांतील शेतीला एका काळांत महापुरांनीं व एका काळांत पाण्याच्या अभावीं नुकसान पोंचतें. यावर उपाय म्हणजे ठिकठिकाणीं धरणें बांधून पाणी अडवून ठेवणें. असें पाणी अडवून ठेवलें कीं त्याच्यापासून शेतीला मदत होईल नि विजेचें उत्पादनहि करतां येईल. अशा दुहेरी उपयोगाच्या दृष्टीनें धरणें बांधलीं म्हणजे त्याचा खर्च विभागला जाऊन त्यापासून उत्पन्न केलेली वीज स्वस्त दरानें गिऱ्हाइकांना द्यावयास परवडते व स्वस्त वीजपुरवठा हा देशाच्या औद्योगिक प्रगतीस कारणीभूत होतो.

**बंगाल**

बंगाल प्रांताच्या अतिउत्तरेस हिमालयालगतच्या टेंकड्या असून तेथें हंगामांत मुबलक पाऊस पडतो. परंतु सध्यां तेथें फक्त दोनच केंद्रें उभारलेलीं आहेत. पैकीं एकांतून दार्जिलिंगला वीजेचा पुरवठा केला जातो. आणखी कित्येक ठिकाणीं वीजकेंद्रें उभारून सध्यांचा वीजपुरवठा पुष्कळच वाढवितां येण्यासारखा आहे. याशिवाय जलधका नदीवर सुमारें १२ हजार ते ५० हजार किलोवॅट शक्तीचें केंद्र उभारतां येण्यासारखें आहे. बंगालच्या याच अतिउत्तर प्रदेशांतून तिस्ता नदी वाहते. सिकिममध्यें उगम पावून अनेक टेकड्यांमधून वहात ती ब्रह्मपुत्रेस मिळते. तिला पावसाप्रमाणेंच बर्फ वितळूनहि भरपूर पाणीपुरवठा होतो. परंतु केवळ वीज उत्पादनासाठी या नदीला धरणें बांधावयाचीं म्हटलीं तर ते जबर खर्चाचें काम होऊन उत्पादित वीज फार महाग पडेल. शेतीच्या कामासाठी या नदीवर धरणें बांधलीं गेलीं तर मग त्यांच्या खर्चापैकी अल्प भागाचा बोजा स्वीकारून वीजकेंद्रें काढणें या ठिकाणीं फायद्याचे होईल. एरवीं होणार नाहीं.

**आसाम**

आसाममधील सुमारें १५ ठिकाणांची या दृष्टीनें पहाणी एकवार केली गेली असून आसामचें प्रांतिक सरकार त्यापैकी कांहीं निवडक ठिकाणांची पुनः पाहणी करीत आहे. या पंधरा ठिकाणांपैकीं मार्गेहरित या गांवाजवळील ठिकाणीं सुमारें ६८ हजार किलोवॅट वीजशक्तीचें केंद्र उभारतां येण्यासारखें आहे. परंतु हें ठिकाण अगदीं आडमार्गाला असल्यामुळें तें निरुपयोगीच ठरतें. बाकीच्या ठिकाणीं २०० ते ६२०० किलोवॅट शक्तीचीं केंद्रें निघूं शकतील.

**बिहार**

बिहारमधील मुख्य वीजशक्ति उत्पादनाची योजना दामोदर नदीवरील होय. दामोदर नदीला वेळोवेळीं भयंकर पूर येतात नि तिच्या आसमंतातील प्रदेश जलमय होऊन जातात. या तिच्या अवखळपणाला आळा घालण्यासाठी तिजवर सुमारें आठ ठिकाणीं धरणें बांधण्यांत यावयाचीं आहेत. व त्यापासून शेतीला पाणीपुरवठा व वीज उत्पादन हीं दोन्ही कार्यें घडून येणार आहेत. पैकी सहा केंद्रें महत्त्वाचीं होतील. पुराचे हंगाम सोडून ज्या दिवसांत नदीच्या पाण्याचा खळखळाट होतो त्या दिवसांत आवश्यक वाटल्यास वाफेवरून वीज उत्पन्न करण्याची सोयहि कांहीं ठिकाणीं करण्याची योजना आहे. या धरणांपासून वीजशक्तीच्या उत्पादनाव्यतिरिक्त दुसरा फायदा असा होणार आहे कीं सुमारें सात लक्ष साठ हजार एकर जमिनीला पाटाच्या पाण्याची कायमची सोय लाभेल. अमेरिकेंतील टेनेसी व्हॅली-योजनेच्या धर्तीवर ही दामोदर व्हॅली योजना होणार आहे. नेपाळमध्यें उगम पावून उत्तर बिहारमध्यें वहात येऊन भागलपूरजवळ गंगेला मिळणाऱ्या कोसी नदीचाहि उल्लेख येथें करणें आवश्यक आहे. नेपाळांतून निघण्यापूर्वी एकूण तीन नद्या मिळून कोसी नदी होते; व तिघी मिळून सुमारें २३ हजार चौरस मैलाच्या हिमालयीन प्रदेशांतील पाण्याचा निचरा तिच्यांत होतो. शिवाय तिचें पात्र सारखें बदलत असतें. गेल्या सुमारें २०० वर्षांत तें ६० मैल बदललें आहे. यामुळें या नदीच्या प्रवाहावर कांहींतरी नियंत्रण घालणें जरूर झालें आहे. त्या दृष्टीनें नेपाळ सरकारच्या अनुमतीनें पाहाणी चालली आहे. त्या नदीला नेपाळांतील संगमाजवळ मोठें धरण बांधण्यांत यावयाचें आहे. त्यामुळें वीज उत्पादनाचीहि सोय अपसुखच होणार आहे. सुमारें २ ते ५ लक्ष किलोवॅट वीज येथें निर्माण होऊं शकेल परंतु तिचा फायदेशीर विनियोग करावयास समर्थ अशी औद्योगिक प्रगति मात्र आसमंतांत अजून झालेली नाहीं. भागलपूर, मोंघीर वगैरे शहरें याच कक्षेंत आहेत. परंतु औद्योगिक दृष्ट्या तीं अजून बाल्यावस्थेंतच आहेत.


★ प्रगति हीच लोकप्रियता ! ★

१९४६ साल सर्व दृष्टींनीं खडतर असतांही अनेक अडचणींना तोंड देऊन

**वेस्टर्न इंडिया**

नें

नवीन काम २ कोटींवर पूर्ण करून अभिमानास्पद प्रगती केली. निश्चित लोकप्रियतेची ही खूण आहे.

आपले विमे याच कंपनींत उतरा व स्वास्थ्य मिळवा. माहितीसाठीं लिहा अथवा भेटा.

एजन्सीसाठीं चौकशी करा.

—: मॅनेजर :—

**वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.,**

सातारा.

पुणें शाखा कचेरी:—कर्वे वाडा, लक्ष्मी पथ, बेलबाग.

## मुंबई प्रांताचा "सावकारी-नियंत्रण-कायदा" व जंगम तारणावरील छोटीं कर्जे. व्यवहारासंबंधीं ऋणकोंच्या अडचणी

ले.:—श्री. चिं. श्री. खरे, सटाणें (जि. नाशिक)

हिंदी जनतेपैकीं, शेंकडा पाऊणशें लोकांचें उत्पन्न त्यांच्या कुटुंब-पोषणार्थही अपुरें आहे. म्हणून चालू महागाईचे व काळा बाजार परिस्थितींत त्यास त्यांच्या रोजच्या गरजा भागविणेस व दैवी - अपत्तीप्रसंगींच्या वगैरे निकडीच्या, जरूरीच्या व फार महत्त्वाच्या गरजा भागविणेस, पांच-पन्नास रुपयांच्या आंतील, कैकवेळां, दोन-पांच रुपयांच्या आंतील रकमांचीं छोटीं कर्जे, खाजगी सावकाराकडून, जिवापाड सांभाळलेलें किडूक मिडूक तारण देऊन, काढावीं लागतात. कारण, तारणावांचून कर्जे मिळणें अशक्य व नियंत्रण अमलांत आलेवर, अगदीं अशक्य. सरकारपुरस्कृत बँका, सोसायट्या व तत्सम संस्था, यांजकडून अपुरा मोबदला म्हणून, तारणावरही छोटीं कर्जे मिळूं शकत नाहींत, अशीं कर्जे कायदाकक्षेंत मिळणेची सोय सरकारनें अधिकृत व पुरस्कृत—सावकारांकडून, ऋणकोस, तारणावर तावडतोब न्याय्य, सहज—सुलभ व सरळ पद्धतीनें केली गेल्यावर, नियंत्रण कायदा अमलांत येणें ऋणकोंचे हिताचें होईल, नाहींतर, खाजगी सावकाराकडून, थोडें जास्त व्याज घेऊन कां होईना, छोटीं कर्जे मिळणेची अस्तित्वांत असलेली सोय नाहींशी होऊन, गरज भागविणेची दुसरी सोय नाहीं म्हणून बिगरपरवाना सावकाराचे, काळे सावकारीस, ऋणकोस, असहाय स्थितींत, निरुपायानें वळी पडावें लागेल. ऋणको—हितार्थ तरी, तारणावर छोटीं कर्जे ऋणकोस, कायदा—कक्षेंत मिळणेची सोय, सरकारनें प्रथम करावी व नंतरच कायदा नियंत्रण अमलांत आणावें, हें न्याय्य ठरेल.

### कायदा नियंत्रणः उद्देश

गैरवाजवी, अन्यायी व अर्थशोषक ( पठाणी ) सावकारी व्यवहाराबाबत वेळींच जरूर तो आळा घालणें व जुलुम, जबरदस्ती, फसवेगिरी टाळणें, त्याचप्रमाणें योग्य व्याजानें छोटीं कर्जे गरजू—ऋणकोस न्याय्य पद्धतीनें तावडतोब मिळणें, हा कायदा नियंत्रण करण्यांत सरकारचा शुद्ध व उदात्त हेतू आहे.

### कायदा कक्षेंतील अपुरा मोबदला

कायद्यानें मंजूर केलेलें व्याज स्माल लोन्स—छोटीं कर्जे—बाबत अव्यवहार्य आहे, हें सरकार—पुरस्कृत संस्था, तो व्यवहार करणेचे टाळतात, यावरून, सिद्ध आहेच. शिवाय खाजगी सावकार—परवाना (लायसेन्स) घेऊन प्रामाणीकपणें, हा व्यवहार करणेस कोणीही पुढें येणार नाहींत, कारण मोबदला अपुरा व तसदी फार.

### छोटीं कर्जे व व्यवहार परवडणारी सोय

अमेरिका, इंग्लंड वगैरे स्वतंत्र देशांतून या जंगम तारणावरील छोटीं कर्जे व्यवहारसंबंधीं, काय पद्धती व कायदे आहेत, याची माहिती विचारांत घेऊन, त्याप्रमाणें आपलें देशांत, आपले राष्ट्रीय सरकारनें, जरूर व योग्य तो फेरफार होणारें कायद्यांत करावा व नंतर शक्यतो हा व्यवहार सोसायट्या, बँका, व तत्सम सरकार—पुरस्कृत व कायदा—नियंत्रणानें—अधिकृत—सावकाराकडून, मागे दर्शविलेलें दोष व अडचणी बाबत विचार होऊन, ऋणकोस छोटीं कर्जे, जंगम तारणावर तावडतोब व जरूर त्या सवलतीनें मिळणेची योग्य ती सोय प्रथम करण्यांत यावी. खाजगी सावकारास, ॲग्रीमेंट स्टॅम्प व प्रॉमिसरी नोट स्टॅम्पची, अट ठेवण्यांत येऊं नये. कारण तोही सरकार—मान्य पद्धतीनें सावकारी करणार. व्याजाचा दर, या व्यवहारापुरता तरी, फेरविचार होऊन ठरविण्यांत यावा. कायद्याप्रमाणें, अपकीप चार्ज वगैरे खर्च आकारण्यास परवानगी आहे. परंतु त्याचाहि स्पष्ट शब्दांत शक्य तो सविस्तर खुलासा वेळींच करण्यांत यावा. किमान व्याजहि ठरविण्यांत यावें.

### कर्जाबाबत सोय न झाल्यास दुष्परिणाम

अन्न, वस्त्र व आरोग्य, या रोजच्या गरजा बाबत, शक्य ती सुपूर्तता, सहज व सरळपणे सुलभता, न्याय्य व सचोटीचे मार्गानें, होऊं न शकल्यास, मतलबी, व्यापारी व शेतकरी लोक, काळा बाजार करून, असहाय लोकांस पिळून, त्यांची गरज भागवितात. पण या सर्व गोष्टीमुळें, गरिबांची पिळवणूक होऊन, हाल होतात व त्यास निरुपायानें, सावकाराकडून कर्जे काढणें भाग पडतें. शेंदोनशें रुपयांचे वरील कर्जास, कायदा कक्षेंत व्याज परवडतें, परंतु छोट्या कर्जास कायद्यानें ठरविलेलें व्याज परवडत नाहीं, म्हणून, तो व्यवहार कदाचित् बंद पडेल. परंतु, लबाड सावकार, हा व्यवहार परवाना न घेतां, कदाचित परवाना मेळूनही, हिंमत व शिफारशीनें व चटक लागलेल्या लांचलुचपत पद्धतीनें, काळी सावकारी, भरमसाट करतील व काळ्या बाजारांत ह्या काळ्या सावकारीची भर पडेल. मग गुन्हेगार कोण? सरकार, ऋणको कां गरज भागविणारा सावकार, व कायद्यांतील शुद्ध व उदात्त हेतू निष्फळ ठरतील. गरिबांचे हाल कमी न होतां, त्यांची अस्तित्वांत असलेली, छोटीं कर्जे मिळणेची सोय, कायदा नियंत्रणानें, नाहींशी झाल्यास व सरकारनें जरुर ती सोय न करतां, कायदा नियंत्रण अंमलांत आणल्यास असहाय गरजू ऋणको, काळ्या सावकारीस निरुपायानें, न कळत मोठ्या प्रमाणांत मदत करील. कारण, त्यास दुसरा उपाय नाहीं. म्हणून प्रथम जरूर ती सोय, व नंतरच कायद्याची अंमलबजावणी व्हावी. म्हणजेच पठाणी व तत्सम सावकारीस, वेळींच, आळा बसेल. कायदा—नियंत्रण करणेचा शुद्ध व उदार हेतू साध्य होईल, व काळ्या बाजारास भर टाकणारी ही काळी सावकारी, वेळींच टळेल. या अन्नवस्त्र व आरोग्याबाबतच्या रोजच्या गरजेच्या महत्त्वाच्या व जरूरीच्या जंगम तारणावरील छोटीं कर्जे व्यवहाराकडे, सरकारनें आस्थेनें व सहानुभूतीनें लक्ष देऊन, कायदा होणेपूर्वी, त्यांत वेळींच जरूर ते फेरफार करून, असहाय गरजू ऋणकोस मदत करावी.

---

### निर्णायक तारीख कोणती !

२३ मे रोजीं एका विमा इच्छुकानें दोन हजाराचा विमा उतरविण्याचा विचार करून कंपनीकडे योग्य तो इसाही भरला. दुसऱ्या दिवशीं कंपनीच्या डॉक्टरांनें त्याची वैद्यकीय तपासणी केली. हप्त्याच्या रकमेबद्दल त्याला पावती देऊन असें कळविण्यांत आलें कीं कंपनीस पसंत पडल्यासच तुमचा विमा स्वीकारण्यांत येईल. पुढें कंपनीला विमा मूळ अटींप्रमाणें घेणें योग्य वाटलें नाहीं परंतु विमा इच्छुकाचें वय आठ वर्षांनीं अधीक धरून व तदनुषंगानें हप्त्याची रक्कम वाढवून कंपनी विमा उतरविण्यास तयार होती. परंतु ६ सप्टेंबरपर्यंत या बाबत कांहींच निश्चित ठरलें नाहीं; पुढें त्या दिवशीं मात्र एका एजंटाच्या आग्रहावरून त्यानें जादा हप्त्याचा विमा स्वीकारला. विमापत्रकांत जरूर त्या दुरुस्त्या करून त्यावर विमेदाराच्या सह्या घेऊन तें जूनमध्यें त्याच्या स्वाधीन करण्यांत आलें त्यावर तारीख मात्र २३ मे हीच होती व वार्षिक हप्ता भरण्याची तारीखहि तीच दाखविण्यांत आली होती. पुढील वर्षाच्या जून ३० रोजीं विमेदार दुसरा विमा हप्ता न भरतांच मरण पावला. कंपनीचें म्हणणें पडलें कीं विम्याची निर्णायक तारीख २३ मे ही होती व त्या दिवशीं विमा हप्ता भरलेला नव्हता म्हणून विमा रद्द झाला होता. विमेदाराच्या वारसाचें म्हणणें पडलें कीं सप्टेंबर ६ पर्यंत विमा उतरला गेलाच नव्हता. त्या तारखेस जादा हप्त्यांची रक्कम भरल्यावर विमेदाराला विमापत्रक देण्यांत आलें. म्हणून ती तारीख निर्णायक होय; किंवा निदान ११ जून ही तरी निर्णायक तारीख म्हणावी लागेल. कारण त्या तारखेला कंपनीकडून विमेदारास जादा हप्त्याच्या विमा घेण्याबद्दल सूचना करण्यांत आली. या दोन्हींपैकीं कोणतीहि तारीख धरली तरी विमेदाराच्या मृत्यूपर्यंत विमा चालू असल्याचें दिसून येतें. कोलोराडो सुप्रीम कोर्टानें निर्णय दिला कीं विमेदाराचा पहिला अर्ज नाकारलाच गेला होता, व ६ सप्टेंबरपर्यंत कंपनीची दुसरी सूचना त्यानें मान्य केली नव्हती. यावरून ६ सप्टेंबर रोजीं नव्यानेंच विमेदारानें विमा करार मान्य केला असें उघड होतें. अर्थातच विमेदाराच्या हयातींत दुसरा हप्ता देण्याची वेळच आली नव्हती. म्हणून विमेदाराच्या मृत्यूचे वेळीं विमा करार चालूच होता; रद्द झालेला नव्हता व विमा रक्कम विमेदाराच्या वारसास देणें कंपनीला भाग आहे.

## जर्मन उद्योगधंद्यांचें तज्ज्ञांकरवी सूक्ष्म निरीक्षण

जर्मन उद्योगधंद्यांसंबंधीं उत्कृष्ट तपशीलवार माहिती मित्रराष्ट्रांचीं लष्करी व इतर खातीं आणि संशोधन संस्था ह्यांनीं जमा केली आहे. त्यांत युद्धकाळांतील कारखाने व त्यांची कार्यपद्धति ह्यांचीहि माहिती आहे. ब्रिटिश सरकारनें रिपोर्टांचे स्वरूपांत ती प्रसिद्ध केली आहे. हिंदुस्थान सरकारच्या पेटंट कचेरीकडे अशा रिपोर्टांच्या प्रति आल्या असून लोकांना त्या पहावयास मिळूं शकतील. लॉर्ड रे महाराष्ट्र इंडस्ट्रियल म्यूझियमकडे त्यांपैकी २६ रिपोर्ट धाडण्यांत आले आहेत त्यांची यादी खाली दिली आहे. ती हितसंबधीं लोकांना उपयुक्त वाटेल.

### रिपोर्टांची यादी


1 German Woodbending Industry.
2 Brass Hardware and Fittings.
3 Manufacture of Brushes in Germany.
4 Pressed Wood and Plywood Plants at Stadthagen, Troisdorf, Mannheim and Wendlingen.
5 Visitsxto Targets Connected with the German Plywood Industry.
6 German Lincleum and Related Floor-covering Industries.
7 German Spiring Making Industry.
8 The German Pin and Allied Products Industry.
9 German Mattress and Furnishing Spring Making Industry.
10 Hosiery Needle Making Industry.
11 Welding of Aluminium and Aluminium Alloys with particular reference to the Manufacture of Pressure Vessels.
12 German Gear Cutting Plant, Gear Manufacturing Technique and Design Development,
13 German Anodising Practice.
14 Some Developments in Dairying in Germany.
15 Production of Flour and Bread in Germany
16 A Survey of Certain German Manufactures of Grain Handling, Cleaning and Milling Machinery.
17 Albumen and Egg Substitute Industries.
18 Certain Aspects of The German Fishing Industry.
19 German Artists' Colour Manufactures.
20 German Electroplating Industry.
21 Dehydrated Potatoes and Vegetables.
22 German Clock and Watch Industry.
23 A Supply of the German Can Industry during the Second World War.
24 Thermocolour Paints I. G. Farbenindustrie, Oppau.
25 The Manufacture of Synthetic Butter.
26 Observations on the German Fruit Juice Industry.

---

**वृत्तपत्रांच्या कागदाचें उत्पादन**—अंदमान येथें सापडणाऱ्या लाकडासंबंधी शास्त्रीय संशोधन यशस्वी ठरलें, तर वृत्तपत्रांना लागणारा कागद हिंदुस्थानांत तयार करणें शक्य होईल, असें अधिकृत मत प्रसिद्ध झालें आहे. हिंदुस्थानामध्यें वृत्तपत्रांच्या कागदाचा वार्षिक खप १,००,००० टन एवढा आहे, परंतु तूर्त परदेशांतून २५,००० टनहि कागद मिळूं शकत नाहीं.

**युरोपियन अधिकाऱ्यांस बदली पाहिजे**—संयुक्त प्रांतांत नोकरी करणाऱ्या एकूण ५० युरोपियन आय. सी.एस. अधिकाऱ्यांपैकीं १२ जणांनी ग्रेट ब्रिटनमध्यें किंवा कोठल्या तरी ब्रिटिश वसाहतींत बदली मागितली आहे.


पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८




साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितिमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

## शेअर-बाजार

( ले— श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्. )

"अर्थ"च्या वाचकांच्या भेटीस आज जवळ जवळ दोन महिन्यानंतर येण्याचा योग येत आहे. वाचकांना आठवत असेल कीं मागच्या सप्टेंबरच्या पहिल्याच अंकांत ज्यावेळेस पंडित जवाहरलाल नेहरूंना मध्यंतरीचे सरकार बनविण्यास निमंत्रण आलें त्यावेळेसच तत्कालीन तेजीचा फुगा एकदम फुटण्याबद्दलचा इशारा आम्ही दिला होता. त्यानंतरच्या दोन महिन्यांत बाजार एकसारखाच खाली खालीच जात आहे तो आज तागायत. बाजार खाली निश्चित जाईल व तेजी होणें शक्य नाहीं असें नंतर 'अर्थां'तून आम्ही इतर दलालांच्या 'हेंही खरें, तेंही खरें' या नेहमीच्या रिवाजास सोडून आग्रहानें लिहिलें होतें. चालू राजकीय आणि आर्थिक घडामोडींवरून तें सिद्धही झाले याबद्दल आम्हांस अभिमान वाटत आहे.

ज्या वाचकांनीं 'अर्थां'त नियमित येणारे बाजारभावाचे आंकडे नियमानें पाहिले असतील त्यांना आढळून आलें असेल कीं, बाजारभाव एकंदरीनें खालच्या पातळीमध्यें १-२ टक्के फरकांतच घुटमळत आहे. जातीय दंग्यांची उग्रता आतां पुष्कळच कमी झालेली आहे. परंतु त्याला पंजाबांत वेगळेंच स्वरूप येऊं लागलें आहे. राजकीय कोंडी काँग्रेसच्या सह्या जानेवारीच्या पत्रकानें फुटेल असा विश्वास निर्माण झाला होता त्यामुळें बॉम्बे डाइंग, ऑलकॉक इ. कंपन्यांनी बोनस शेअर जाहीर केल्याकारणानें बाजारानें जानेवारीचे सुरवातीस एकदां उचल खाण्याचा प्रयत्न केला पण तो क्षणभंगुरच ठरला. ऋषभांना (मंदीवाल्यांनीं) या संधीचा फायदा घेऊन ठोकठोक वेचाण आरंभली आणि कासावीस झालेल्या वृषभांनी अंगावर पडलेला माल काढून टाकून अडकलेल्या माना मोकळ्या करण्याची चपळाई केली. त्याचा परिणाम बाजार पुन्हा एकदा घरंगळीला लागण्याकडे झाला. अजूनही शेअर बाजार चालू भावांत स्थिरावेल अशीं चिन्हें दिसत नाहींत. मधून मधून एकादा शेअर बोनस प्रभृतींच्या बातम्यांनी उड्या मारतो. उदाहरणादाखल, स्वदेशी आणि कोहिनूर. पण अशा एखाद्दुसऱ्या शेअरच्या अंगीं सबंध बाजाराला वर खेचण्याची ताकद येत नाहीं. भावना विरुद्ध असतांना असल्या शेअर्सचे वर चढणें सुद्धां तात्कालिक ठरतें. हें स्वदेशीच्या कोलांट्या उड्यांवरून सहज कळून येईल. आतां वार्षिक अंदाज पत्रक दोन आठवड्यावर आल्याकारणानें आणखी अस्थिरता उत्पन्न झाली आहे. कांहीं लोकांना अर्थमंत्री मि. लियाकत अलीखान हे लीगचे असल्यामुळें स्वतःचें नाक कापून काँग्रेसला केवळ अपशकुन करण्याच्या नादांत असण्याचा बराच संभव असल्यामुळें मुद्दाम नवीन कर वगैरे वाढविणार नाहींत व जमिनदार आणि भांडवलवाले यांच्या फायद्याचें अंदाजपत्रक सादर करतील असें वाटत असलें तरी हिंदुस्थान सरकारच्या चालू तोंडमिळवणींत प्रसिद्ध झालेली तूट कोणत्या जादूनें ते भरून काढू शकतील असा रोखठोक प्रश्न विचारावासा वाटतो. इंग्लंडमधील स्टर्लिंग शिलकीबाबत पार्लमेंटांत चर्चिल कंपूनें काय कारवाया चालविलेल्या आहेत हें चाणाक्ष वाचकांच्या नजरेतून सुटलें नसेल. स्टर्लिंग शिल्लक जागच्या जागीं आकसली जाण्याचा जोरदार संभव उत्पन्न झाला आहे. त्याचे परिणाम आमच्या उद्योगधंद्यांवर अत्यंत घातक होतील. पदार्थांचे चालू उंच भाव एकदम कोसळल्या शिवाय रहाणार नाहींत. कानपूरकडील, कोळशाच्या खाणींतील आणि संभाव्य पोस्ट खात्याचे संप यांच्याकडे वाचकांनी नजर ठेवली पाहिजे. आणि सरतेशेवटीं मुस्लिम लीगच्या वर्किंग कमिटीनें त्रिमंत्रि योजना पुन्हा एकदा फेटाळून लाऊन घटना समिती बरखास्त करून पुन्हां एकदा अभिप्रेत पाकिस्तान मागणीचा ठराव केलेला आहे. तो लक्षांत घेऊन सरदार वल्लभभाई पटेल प्रभृतींनी मुस्लिम मंत्र्यांना सरकारांतून हाकून लावण्याबद्दल जोराची मागणी केली आहे असें दिल्लीच्या बातम्यांवरून प्रगट झालें आहे. त्यामुळें राजकीय वादळ उठून त्या सोसाट्यांत शेअर बाजार चांगलाच घुसळला जाण्याचा संभव आहे. त्याचें पूर्व चिन्ह म्हणूनच कीं काय मागच्या शुक्रवारीं बाजार भाव शेवटच्या १५१२० मिनिटांत धाडधाड कोसळले.

वरील संक्षिप्त चर्चेवरून बाजाराचें धोरण काय ठरवावें हें वेगळें सांगण्याची जरूरी आहे.


# विजय टेक्स्टाइल्स लि.

—येरंडवणा पुणें ४—

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगीण प्रगति आमच्या भागीदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

मॅनेजिंग एजंट्स्.



शेअर्स विकणें आहेत:—

गोवर्धन डेअरी फार्म्स लि.,
गोवर्धनवाडी, पुणें १.



# दि सुप्रीम म्यूच्युअल अ‍ॅशुअरन्स कंपनी लि.

तुम्ही दूरदृष्टीनें नियमानें ठराविक रक्कम बचत केल्यास तुम्हाला अगर तुमच्या नातेवाईकांना दरमहा निर्वेध मदत मिळण्याची आकर्षक योजना.

कंपनीकडे माहितीपत्रकांसाठीं आजच लिहा अगर भेटा.

हेड ऑफिस
८९६ सदाशिव पेठ, पुणें २

व. न. म्हैसूर, एम्. ए., एलएल्. बी.
मॅनेजर

शाखा:—कराची, धुळें, नागपूर व हुबळी

# चलनांच्या स्थिर किंमती

## पौंड व डॉलर ह्यांचेशीं इतर चलनांची तुलना

**मोनेटरी फंडानें मान्यता दिलेल्या चलनाच्या किंमती**

इंटरनॅशनल मोनेटरी फंडानें मान्यता दिलेल्या चलनांच्या सम किंमती प्रसिद्ध झाल्या आहेत. अप्रत्यक्ष रीतीनें सुवर्णावर त्या आधारलेल्या असल्यानें, चलनाचे बाबत सुवर्णानें आपलें महत्त्व पुनः प्रस्थापित केलें आहे. वेगवेगळ्या देशांनीं स्वतः ठरविलेल्या किंमतीसच मोनेटरी फंडाच्या डायरेक्टरांनीं मान्यता दिली आहे. वास्तविक, ह्या किंमती बरोबर आहेत किंवा नाहींत हें तपासून पहाण्याचा व त्या अमान्य करण्याचा त्यांचा अधिकार होता. परंतु, तो त्यांनीं उपयोगांत आणलेला नाहीं.

| देश | चलन | एका अमेरिकन डॉलरशीं प्रमाण | एका ब्रिटिश पौंडाशीं प्रमाण |
|---|---|---|---|
| बेल्जम | फ्रां | ४३.८२७ | १७६.६२५ |
| बोलिव्हिया | बोलिव्हिऍनो | ४२.००० | १६९.२६ |
| कॅनडा | डॉलर | १.००० | ४.०३ |
| चिली | पेसो | ३१.००० | १२४.९३ |
| कोलंबिया | पेसो | १.७४९ | ७.०५२ |
| कोस्टारिका | कोलोन | ५.६१५ | २२.६२८ |
| क्युबा | पेसो | १.००० | ४.०३ |
| झेकोस्लोव्हाकिया | कोरूना | ५०.००० | २०१.५ |
| डेन्मार्क | क्रोन | ४.७९९ | १९.३४० |
| इक्वेडॉर | सुए | १३.५०० | ५४.४०५ |
| इजिप्त | पौंड | ०.२४१ | ९.७५ |
| साल्व्हेडॉर | कोलोन | २.५०० | १०.०७५ |
| एथिओपिया | डॉलर | २.४८४ | १०.०१२ |
| फ्रान्स | फ्रँक | ११९.१०७ | ४८०:०० |
| गुआतेमाला | क्वेतिआल | १.००० | ४.०३ |
| हॉंडुरास | लेंपिरा | २.००० | ८.०६ |
| आइसलंड | क्रोना | ६.४८८ | २६.१५ |
| हिंदुस्थान | रुपया | ३.३०८ | १३.३३३ |
| इराण | रिआल | ३२.२५० | १२९.९६७ |
| इराक | दिनार | ०.२४८ | १.० |
| लक्झेंबर्ग | फ्रँक | ४३.८२७ | १७६.६२५ |
| मेक्सिको | पेसो | ४.८५५ | १९.५६५ |
| नेदरलंड | गिल्डर | २.६५२ | १०.६९ |
| निगोरग्वे | कोर्डोबा | ५.००० | २०.१५ |
| नॉर्वे | क्रोन | ४.९६२ | २०.० |
| पनामा | बाल्बोआ | १.००० | ४.०३ |
| पॅरेग्वे | गुआरानी | ३.०९० | १२.४५२ |
| पेरू | झोल | ६.५०० | २६.१९५ |
| फिलिपाइन कॉ. | पेसो | २.००० | ८.०६ |
| द. आफ्रिका | पौंड | ०.२४८ | १.० |
| ग्रेट ब्रिटन | पौंड | ०.२४८ | १.० |
| अमेरिका | डॉलर | १.००० | ४.०३ |

**शेअर बाजारांवर नियंत्रण**—कलकत्ता, मुंबई आणि मद्रास येथील शेअर बाजारांची पहाणी करून त्यावरील आपला रिपोर्ट हिंदुस्थान सरकारचे आर्थिक सल्लागार डॉ. पी. जे. टॉमस ह्यांनीं सादर केला आहे. शेअर बाजारांतील अनिर्बंध सट्टेबाजीकडे लक्ष्य वेधून डॉ. टॉमस ह्यांनीं त्यावर उपाययोजना सुचविली आहे,

**सिंध विश्वविद्यालय**— सिंध विश्वविद्यालयाची स्थापना करणारें एक बिल सिंध प्रांताच्या विधिमंडळांत लवकरच मांडण्यांत येईल. विश्वविद्यालयाच्या सिनेटमध्यें शेकडा ७० सभासद मुसलमान असतील. बाकीच्या ३०% मध्यें इतरांचा समावेश होईल.

**हिंदी कपास कापडाच्या गिरण्या**


| | ३१ ऑगस्ट १९४६ अखेर | |
|---|---|---|
| | १९४५ | १९४६ |
| एकूण संख्या ... | ४१७ | ४२१ |
| वसूल भांडवल ... | ५४,३५,७९,७२३ रु. | ५६,१८,३२,६२१ रु. |
| बसविलेल्या चात्या ... | १,०२,३८,१३१ | १,०३,०५,१६९ |
| चालू चात्या ... | ९४,६६,०९८ | ९५,४८,२९५ |
| बसविलेले माग ... | २,०२,३८८ | २,०२,८१४ |
| चालू माग ... | १,९०,६०१ | १,८६,५०५ |
| खपलेली कपास (खंड्या) ... १ खंडी = ७८४ पौंड | २४,५४,६५७ | २२,७४,९६६ |
| दिवसपाळीवरील कामगार... | ५,०९,७७८ | ४,९५,४५६ |

**बराकी खाली केल्या**—ॲलेक्झँड्रिया येथील मुस्ताफा पाशा बराकी ता. ८ रोजीं इंग्रज फौजांनीं खालीं करून इजिप्तच्या स्वाधीन केल्या. ह्या बराकी १८८२ सालापासून इंग्रज फौजांच्या ताब्यांत होत्या.

**छत्र्यांच्या काड्या कोणास पाहिजेत !**— छत्र्यांच्या सुमारें १ कोटि काड्या पुरविण्यास एक ऑस्ट्रियन फर्म तयार आहे. हितसंबंधी लोकांनीं इंडियन सप्लाय कमिशनर, ४५–४७, माउंट स्ट्रीट, लंडन, येथें चौकशी करावी.

**१० लाख टन बटाट्यांचा नाश करणार !**—जगांतील कित्येक देशांत बटाट्याचा दुष्काळ असतांना अमेरिकेला १० लक्ष टन बटाट्यांचा नाश करून टाकावा लागणार आहे. बटाट्यांच्या किंमती वर राखणें हा त्याचा उद्देश आहे.

**नव्या भांडवल उभारणीस परवानगी**—डायमंड ज्युबिली फिनॅन्स कॉर्पोरेशन लि. मुंबई ह्या नव्या कंपनीस १ कोटि रुपये भांडवल उभारण्यास परवानगी मिळाली आहे. त्याचप्रमाणें खानदेश व्हिजिटेबल प्रॉडक्ट्स लि. जळगांव ह्या नव्या कंपनीस ३५ लक्ष रुपयांचें भांडवल उभारता येणार आहे. ३ फेब्रुवारी १९४७ अखेरच्या आठवड्यांत एकूण ८ कंपन्यांना ४ कोटि, १९ लक्ष रुपये भांडवलाची परवानगी मिळाली







चीफ एजंट:—
न्यू दत्त एजन्सी
१००, [illegible] पेठ, मोती चौक, पुणें.

श्री श्री श्री श्री श्री

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

युद्धोत्तर कालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री श्री श्री श्री श्री

लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

# दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर ( बुधगांव ) एम्. एस्. एम्. रेल्वे

नांगर —यांचे— चरक

| | |
|---|---|
| किसान नं. १०१ ( सहा ते आठ बैली ) | विश्वास ( चार बैली ) |
| किसान नं. १०२ ( चार ते सहा बैली ) | वासुदेव ( दोन बैली ) |
| किसान नं. १०५ ( दोन ते चार बैली ) | राजा ( एक बैली ) |

'मधुकर' ( सात फण्याचे ) कोळपें ( दोन बैली )

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ५१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.